सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र. ९२०/वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :-२५/११/२०२१

# —: प्रेस नोट :—

वांद्रे पोलीस ठाणे गु.र.क्र ३२४/२०१८ कलम ३७६, ३५४, ५०६(२) भा.द.वि. सह ४,८ पोक्सो अधिनियम या कलमान्वये यातील आरोपीतास मा. न्यायालयाने १० वर्षाच्या सश्रम कारवासाची शिक्षा आणि २५ हजार रु दंड अशी शिक्षा सुनावल्याबद्दल,

MPDA कायदा व सी.आर.पी.सी कलम १०७ ते ११० अन्वये, तसेच म.पो.का ५६, ५७, १४२ अन्वये व पाहिजे आरोपीतास अटक करून भरीव कामगिरी केल्याबद्दल,

फूटपाथवर राहणाऱ्या एका दहा महिन्याच्या मुलाचे अपहरण झालेबाबत खबर मिळताच आरोपीताबाबत नाव व कोणताही ठावठिकाणा नसताना फिर्यादीस रोज सकाळ-संध्याकाळ जेवण देणारी अनोळखी महिला व तिच्या काढलेल्या स्केच वरून तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर आरोपीताचा कसोशीने तपास करून २४ तासाच्या आत मुंबई येथून एक महिला व एक पुरुष व तेलंगणा येथून दोन पुरुष यास अटक करून दहा महिन्याच्या बाळास सुखरूप फिर्यादीच्या ताब्यात दिल्याबद्दल,

चॅपल रोड येथे येशू ख्रिस्तांच्या मूर्तीचे अज्ञात इसमाने विटंबना केल्यानंतर मिल स्पेशल यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन तात्काळ सदर मुर्तीच्या ठिकाणी नवीन मूर्तीची स्थापना करून कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ दिला नाही,

वर नमुद प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अधिकी व अंमललदार यांचा दि २४/११/२०२१ रोजी १७.०० वा मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई यांनी खार जिमखाना, खार (प), मुंबई येथे पोलीस उप आयुक्त परिमंडळ ९, मुंबई अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव केलेला आहे. सदर वेळी मा. श्री.संदिप कर्णिक,अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. मंजुनाथ सिंगे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ९, यांचे उपस्थितीत सोहळा पार पडला.

(चैतन्या एस्.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner